# १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील देशीवाद

**डॉ. शरद जे. मेश्राम**
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय
अर्जुनी/मोर. जि. गोंदिया
९४०४२७९७९९
sharadssjc@gmail.com

१९९० हे दशक देशाच्या एवढंच नव्हे तर जगाच्याही दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असे आहे. या दशकात जगाचा कायापालट झाला. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यामुळे जगाचा चेहरा मोहराच बदलून गेला. या काळात काही प्रमाणात मूल्यांचा ऱ्हास होऊन आर्थिक चंगळवाद बोकाळला असे चित्र निर्माण होऊ लागले. परंतु सगळाकडची परिस्थिती सारखी नसते. काळानुरूप, परिस्थितीनुरूप समाजामध्ये एकप्रकारचे साचलेपण जाणवू लागते. या साचलेपणाच्या मुळाशी एक किंवा अनेक प्रकारचे प्रश्न असतात. या प्रश्नांचे स्वरूप सामाजिक, राजकीय, धार्मिक अथवा आर्थिक असू शकते. परंतु या प्रश्नांमुळे समाजाची मानसिक, वैचारिक स्वरूपाची कोंडी जाणवत असते. ही कोंडी फुटण्यासाठी परिवर्तनाची आवश्यकता वाटू लागते. परंतु परिवर्तन ही काही एकाएकी घडून येणारी घटना नाही. ती दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. प्रारंभीच्या काळात ही प्रक्रिया सुप्त स्वरूपात अतिशय मंद गतीची असते. हळूहळू ती स्पष्ट आणि गतीमान होऊ लागते. परंतु ही कुणा एकाकडून कधीच शक्य नसते. हळूहळू या दिशेने उमटणारा आवाज वाढत असल्याने यादृष्टीने काही प्रयत्न होत असल्याचे जाणवू लागते. त्याचाच एक भाग म्हणजे देशीवाद.

देशीवाद ही संकल्पना भालचंद्र नेमाडे यांनी मराठी साहित्यामध्ये मांडून सर्व भारतीय भाषा साहित्यामध्ये देशीवादी चळवळ उभी केल्यामुळे ती आता सर्व भारतीय भाषा साहित्यामध्ये जितकी रूजली आहे तितकीच ती आव्हानात्मक ठरली आहे. कारण मराठी साहित्याचा प्रवाह विविध वळणे वळसे घेत समृद्ध होत गेला. त्याचप्रमाणे देशोदेशीच्या वादप्रणालींनी मराठी साहित्यावर आणि साहित्यसमीक्षेवर आपला प्रभाव गाजवला. त्यामध्ये सौंदर्यवाद, वास्तववाद, अतिवास्तववाद, अभिजातवाद, मनोविश्लेषणवाद, मार्क्सवाद, अस्तित्ववाद, स्त्रीवाद, जनवाद इत्यादी वाङ्मयीन अवाङ्मयीन वादप्रणालीच्या अंगाने साहित्याचे मूल्यमापन करण्याचा व जीवनानुभवाची मांडणी करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. या विविध वादप्रणालीत साठोत्तरी कालखंडात देशीवाद किंवा देशीयता या संकल्पनेची नव्याने भर पडली.

मराठी साहित्यसमीक्षेत देशीवाद, देशीयता ही संकल्पना सर्व साधारणपणे १९८० नंतर चर्चेत आली. त्यावर अनेक अभ्यासकांच्या मतमतांतरांनी प्रकाश टाकला. या संदर्भात रवींद्र ठाकूर म्हणतात, “भालचंद्र नेमाडे यांच्या काही स्फुट लेखनातून ही संकल्पना प्रथम प्रकट झाली, परंतु तिची सांगोपांग मांडणी झाली असे म्हणता येणार नाही. उलट नेमाडे यांच्या तिरकस शैलीमुळे ती अस्पष्टच राहिली. त्यानंतरही तिचा गवगवा भरपूर झाला. परंतु देशीवाद म्हणजे नेमके काय ते गुलदस्त्यातच राहिले. क्वचित कुठे देशीवादाचा जो काही पुरस्कार आढळला तिचे नवे मुद्दे आढळण्याऐवजी नेमाडेंचे तेच ते प्रतिध्वनी ऐकू येत राहिले.”१

हे जरी खरे असले तरी देशीयतेचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे व परकीय सांस्कृतिक व इतर आक्रमणाच्या वेळी स्वत:च्या अस्तित्वासाठी देशीवादी होणे एवढा साधा अर्थ घेतला तरी देशीवादाच्या पार्श्वभूमीवर कादंबरीची चिकित्सा करता येणे शक्य होते. कादंबरी हा वाङ्मयप्रकारच मुळात युरोपातील प्रबोधनयुगात उदयास आलेल्या सामाजिक परिस्थितीचे आणि आधुनिक जाणिवेचे फलित होय. १९ व्या शतकातील महाराष्ट्रीय प्रबोधन युगात इतर वाङ्मयप्रकाराप्रमाणे कादंबरीही इंग्रजीतून मराठीत आली आणि रूजली. या संदर्भात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे १९८० साली झालेल्या 'मराठी साहित्य – प्रेरणा व स्वरूप १९५० ते ७५' या परिसंवादामध्ये नेमाडे यांनी सादर केलेला 'मराठी कादंबरी' हा निबंध म्हणजे मराठी कादंबरीचा देशीवादी इतिहासच म्हणावा लागेल. स्थूलमानाने देशीवादाचे सूतोवाच करताना ते म्हणतात,

" मराठी कादंबरी मराठी कादंबरीकारांनी निर्मिली आहे आणि मराठी कादंबरीकार मराठी समाजाने निर्मिलेले आहेत. हे देशीपणाचे भान सतत जागरूक ठेवणे नव्या पिढीला आवश्यक आहे. जगभराच्या नाना भाषांतील नाना कलाकृतींना उचलून त्यांची मराठी कलाकृतींच्या मूल्यमापनासाठी तुलना करण्याची कलात्मक मराठी समीक्षेची वृत्ती अडाणीपणाची असल्याने टाळणे आवश्यक आहे. दोन्ही (?) संस्कृतीचा नीट खोल अभ्यास असल्याशिवाय अशी तुलना करणे समीक्षेलाच धोक्याचे असते. संस्कृती ही कृत्रिम उष्णतागृह नसून एक भूमीनिष्ठ प्रक्रिया आहे हे तत्त्व मानले पाहिजे."[२]

या निबंधात त्यांनी सामाजिक वास्तवाला स्थान देणाऱ्या कृतीप्रधान कादंबरीचा पुरस्कार केला आहे. मराठी समाजाची नैतिक निष्ठा सांभाळत सामाजिक आणि भाषिक कलात्मक कृती निर्माण करण्यामागे ते देशीपणाच्या भानाला आत्यंतिक महत्त्व देतात. या पार्श्वभूमीवर १९९० नंतरच्या कादंबरीचा आढावा घेतल्यास प्रामुख्याने त्यातील बहुतेक कादंबऱ्या ग्रामीण परिसराच्या ऱ्हासाचे चित्रण करताना दिसतात व त्याला सामोरे जाण्याकरिता देशी मूल्यांची जोपासना करण्यावर कादंबरी लेखकांनी भर दिल्याचे दिसून येते.

विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा' मधून एका तपाची, झपाट्याची वाटचाल दाखविलेली आहे. रूढार्थाने कादंबरीला नायक नाही, नायिका नाही, खलनायकही नाही. जनसामान्यांचे जीवन हाच खरा कादंबरीचा विषय. सर्व अंगोपांगांनी गावं बदलली, बदलत आहेत. तमाशासारख्या लोककलांचा ऱ्हास होत आहे. आडवळणी गावातही 'ब्लू फिल्म' स्वस्तात मिळू लागली. खेड्यापाड्याचं रंगरूप बदलून गेलं आहे. वाढत्या लोकसंख्येच्या ताणामुळे एकत्र कुटुंब पद्धतीला तडे गेले. बलुतेदारी जवळजवळ नाहिशी झाली याची खंत करताना इथली मूल्यव्यवस्था जपून ठेवण्याचे आव्हान लेखकाने केले. हे देशीपणाचे भान यातून दिसते. समाजवासतवात पाळेमुळे नाहीत अशा आशयसूत्राशिवाय कादंबरी उभी राहू शकत नाही हे अलीकडील कादंबऱ्यांनी दाखवून दिले. त्यांच्यात 'झाडाझडती' या कादंबरीत आपादग्रस्त जीवनाचे आशयद्रव्य अत्यंत ताकदीने उभे केले आहे. धरणामुळे केवळ गावेच नाहीत तर माणसेही आमुलाग्र उद्ध्वस्त झाली. काही परांगदा झाली, काही पुनर्वसनाच्या वळचणीला येऊन उपरे म्हणून जगू लागली. धरणग्रस्तांच्या हालअपेष्टा सरकारी कागदी धोरणे, अंतर्गत हेवेदावे, संधीसाधूंची राजकारणे इत्यादी अनेक बाबींचे लेखकाने गुंफलेले ताणेबाणे अत्यंत रेखीवपणे चितारले आहेत. इथल्या मातीवर, आपल्या शेतजमीनीच्या तुकड्यावर प्रेम करणारा देशी माणूस, त्याचे अंतरंग या निमित्ताने त्यांनी रेखाटल्याचे दिसून येते. तर तंत्रज्ञानाच्या रेट्यात पारंपरिक बलुतेदारी कशी मोडकळीस येते व त्यामुळे निव्वळ बलुतेदारीवर विसंबून असणारी कुटुंबे कशी उद्ध्वस्त होतात याचे चित्रण बाबाराव मुसळे यांच्या 'पखाल' या कादंबरीतून

दिसून येते. गावखेड्यातील मांगल्य, देवळातील भजनं, पोथ्या, हरिपाठ, कीर्तनं, भागवत समाप्तीच्या गावपंगती हे सर्व कालबाह्य झालं. त्याची जागा आता रिकामटेकड्या वायफळ गप्पा व राजकारणाचे कुटील डाव यांनी घेतल्याची खंत लेखक व्यक्त करतो. या मातीतील अस्सल देशीपणाचे भान ठेवत त्याची जपणूक करण्याची तळमळ प्रकर्षाने दिसून येते. माधव कोंडविलकर यांच्या 'डाळं' मधून एका दरिद्री बाईत कुटुंबाची कहाणी आहे. एक पक्के कौलारू घर आणि एक बैलजोडी एवढीच अपेक्षा असलेल्या कुटुंबाची दिवसरात्र राबूनही इच्छा पूर्ण होत नाही यावर विदारक भाष्य करताना समाजजीवनातील मूल्यांचा होत असलेला ऱ्हास याचे चित्रण आलेले आहे.

सदानंद देशमुख यांच्या 'तहान' या कादंबरीतून बदलत्या ग्रामीण समाजजीवनाला अर्थार्जनाच्या अपुऱ्या संधीमुळे मानसिक दृष्ट्या सैरावैरा झालेल्या माणसांच्या व्यथा, वेदनांना शब्दरूप दिले. सध्याच्या विघटन काळातील ग्रामीण समाजाच्या पडझडीचे आशयविश्व शब्दरूपात मांडण्याचा ध्यास, जीवनातील नाट्य, काव्य, विपरितता, वेधकता यांचा साज असलेली त्यांची ग्रामीण बोली साहित्यक्षेत्रात लक्षवेधी ठरली. पाणी टंचाईमुळे उद्ध्वस्त झालेले खेडे चितारताना अस्सल देशी बाज अपल्याला लेखनातून जाणवतो. रंगनाथ पठारे यांच्या 'नामुष्कीचे स्वगत' मधून जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या मूल्यऱ्हासाचे चित्रण करताना नेमाडे देशीवादी भूमिका घेतांना दिसतात.

" ईश्वराने प्राणीमात्रासकट माणसाला जे जे काही घालून दिलेले आहे त्याचा आदर करण्याची आपली रीतच आहे आणि युरोपिय लोकांप्रमाणे माणसाचा सुटा विचार आपण करत नाही किंवा माणसाच्या कल्याणसाठी बाकी सारे जसे प्राणी, वनस्पती, दगडधोंडे, माती, खनिजे असा भोगवादी आदर्शही हिंदुस्थानी परंपरेत नाही."[३]

भारतीय परंपरेतील मांगल्याचं दर्शन घडविताना आपल्या मूल्यव्यवस्थेचा परिचय लेखक करून देतो किंवा " जगबुडी काही सहजी होत नाही. त्यासाठी या भोगवादी लोकांचे प्रयत्न आटोकाट चालू आहेत तरीही पृथ्वी आहे. ती वसुंधरा आहे तोवर माणुसकी राहणार आहे."[४]

असा विश्वास व्यक्त करताना घेतलेली देशीवादी भूमिका महत्त्वाची आहे. तर शिकूनही दारिद्र्य आणि बेकारी यामुळे अगतिक झालेल्या तरूण पिढीची दिशाहिनता, शहरीकरणाच्या संपर्कामुळे निर्माण झालेला वाढता चंगळवाद, जागतिकीकरणाचे शेतीवर झालेले दुष्परिणाम, बेभरवशाच्या शेतीमुळे सतत भेडसावणारी उद्याची चिंता आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांना कराव्या लागत असलेल्या आत्महत्या, सरकारची उदासीनता आणि त्यातही शिरलेले राजकारण आणि भ्रष्टाचार असे कितीतरी विषय आपल्या आशयकक्षेत सामावून घेणारी सदानंद देशमुख यांची 'बारोमास' ही कादंबरी म्हणजे आजच्या विषमता पोसणाऱ्या अर्थव्यवस्थेचा आणि समाजव्यवस्थेचा जाहीर पंचनामाच आहे.

'बुढाई' या कादंबरीत प्रतिमा इंगोले यांनी छोट्या मोठ्या शहरातील आजूबाजूची पिकांखालील काळी जमीन घरांसाठी वापरली जाते आहे, ही जमीन घर बांधण्यासाठी अयोग्य असते तरीही विज्ञानाच्या नव्या तंत्रज्ञानामुळे या जमीनीवर सिमेंटचे एक नवे जंगल तयार होते आहे. त्यामुळे पिकाखालील जमीन कमी होते. पर्यायाने तितके धान्य निरूपयोगी असते. त्यामुळे ती ओसाड पडून वाया जाते. याचा परिणाम सृष्टीचक्रावर होतो. एकूणच या मातीवरील प्रेमापोटी खेडे ओस पडत चालल्याची खंत लेखिकेने प्रकर्षाने नोंदविली. बोलीभाषा व ग्रामीण परिसराचे केलेले चित्रण यामध्ये अस्सल देशीभान आपल्याला दिसून येते. 'अंधाराचे वारसदार' या कादंबरीतून दादासाहेब मोरे यांनी पारंपरिक गावगाड्याचे झपाट्याने बदलणारे स्वरूप,

त्यामुळे कृषिकेंद्रित ग्रामव्यवस्थेच्या गरजा देखील आमुलाग्र बदललेले आहे. औद्योगिक क्रांती, यंत्रसंस्कृती आणि भांडवलशाहीच्या विकासामुळे कृषी व्यवसायाशी संबंधित अशी औजारे तयार करणारे, ती दुरूस्त करणारे ग्रामीण भागातील बलुतेदार देशोधडीला लागले आहेत यावर विदारक भाष्य केले. अस्सल देशीपणा जाऊन अस्थिरता, असुरक्षितता, अशांतता, अगतिकता आणि यातून निर्माण होणारी अस्वस्थता ही आजच्या युगाची वैशिष्ट्ये बनली आहेत. पर्यायाने मूल्यव्यवस्था पायदळी तुडविल्या जात आहे याची नोंद देशीपणाच्या पार्श्वभूमीवर लेखकाने घेतली आहे. तर 'सेलझाडा' या कादंबरीतून नामदेव च. कांबळे यांनी बलुतेदारीचा होणारा ऱ्हास अस्सल देशीबोलीचा वापर करीत त्यांनी जिवंतपणे नोंदविला आहे. गहू– सुपा यांच्या प्रापंचिक व्यथांपासून सुय होणारी कादंबरी पुढे एक व्यापक अर्थ घेते. गहू सुपाचा संसार हे बलुतेदारीच्या ढासळत्या परिस्थितीचे प्रतिक आहे. उद्ध्वस्त होत असलेल्या कृषिजनसंस्कृतीने उदरनिर्वाहाकरिता गाव सोडण्याची वेळ गहू सुपावर येते तेव्हा त्यांच्या मनातील कालवाकालव अत्यंत उत्कटतेने लेखक चित्रित करतो.

"काय सांगावं माय, वढ मातीचे आस्ते का माणसाची असते' अशा छोट्या छोट्या वाक्यातून या मातीविषयी असणारे लेखकाचे देशीप्रेम दिसून येते. 'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीतून भारत काळे यांनी ग्रामीण परिसरातील वास्तव रेखाटताना प्रामुख्याने एकत्र कुटुंबपद्धतीचा होत असलेला ऱ्हास, शेतकऱ्यांची दयनीय अवस्था, पारंपरिक आदर्श मूल्यव्यवस्था नष्ट होत असल्याचे चित्रण खास देशीवादी पद्धतीने केले आहे. काशीनाथ व विश्वनाथ या रक्ताच्या नात्याने या हवालदिल परिसिथितीमुळे दूर जाणे व एकमेकांच्या जीवावर उठणे हे भयावह वास्तव भेदकपणे नोंदविले आहे. 'ब्र' या कादंबरीतून कविता महाजन यांनी समाजसुधारणेचे कार्य करताना आदिवसी पाड्यावरील बकालपणाचा वेध घेतला आहे. जागतिकीकरणाच्या या युगात भरडल्या जाणाऱ्या आदिवासी जीवनाची कथा रेखाटली व जीवन जगण्यातील आदिवासी स्त्रीयांना करावा लागणारा संघर्ष, पाड्यावरील राजकारण यावर विदारक भाष्य केले आहे. लक्ष्मण गायकवाड यांच्या 'उठाव' या कादंबरीत स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजातील लोकांचे मन एक अपेक्षा घेऊन जगत होते. पण स्वातंत्र्यानंतर या अपेक्षा भंग पावल्या. राजकीय, सामाजिक, नोकरशहा यांच्या स्वार्थी, लोभीपणामुळे गोर, गरीब, सामान्य, दु:खी लोकांना न्याय मिळण्याऐवजी त्यांची पदोपदी फसवणूकच होत आहे. त्यामुळे अनितीचे, अन्याय, अत्याचाराचे थैमान चालू आहे. याचा परिणाम सर्वसामान्यांच्या जीवन जगण्यावर झाला. गरिबी, दारिद्र्य, महागाई यांचे टोक हिमपर्वतासारखे वाढत गेले. याचे चित्र लेखकाने रेखाटले. लेखक स्वत: महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांच्या विचाराची धुरा वाहणारे आहेत. ही भावनाच अस्सल देशीवादी आहे हे स्पष्ट होते. 'एसईझेड' (सेझ) या शंकर सखाराम यांच्या कादंबरीतून सेझमुळे आर्थिक विकास न होता ग्रामसंस्कृतीचा गळा घोटायला निघालेले भांडवलदार व त्यांना साथ देणारे राजकारणी त्यामुळे संपूर्ण कृषिसंस्कृती, ग्रामसंस्कृती, आदिम समाज, जनजाती कायमच्या उद्ध्वस्त होत आहेत. यातूनच भूमीपूत्र, बलुतेदार, मजूर, कामगार यांच्या जीवनमरणाचा प्रश्न उभा राहिला आहे. तेथील भूमीपूत्रांची जगण्यासाठी चाललेली धडपड लेखकाने बोलीभाषेच्या लकबींसह चितारून तो खारेपट वाचकांसमोर उभा केला. देशी मूल्यांवरील विश्वास व तो टिकवून ठेवण्याची धडपड यातून दिसून येते. प्रवीण दशरथ बांदेकर यांनी 'चाळेगत' मधून तळकोकणातल्या गेल्या दोन दशकातल्या राजकीय, सामाजिक पडझडीचे चित्रण करताना जागतिकीकरणाच्या या लाटेत मोडकळीस आलेला ग्रामीण परिसराचा आलेख उभा केला आहे.

" अगदी सुरूवातीला गावोगावच्या ग्रामदैवतांच्या जत्रा ही केवळ निमित्त होती, एकत्र येण्याची, समूहमनाच्या रांगड्या आविष्काराची, पण कोणे एकेकाळी मुळात, खेड्यापाड्यांतल्या कुणब्या, कुळवाड्यांनी ही कृषिजन संस्कृतीची निकड म्हणून सुरू केलेला उपद्रवी पशूंच्या शिकारीचा हा खेळ काळाच्या ओघात बदलत गेला होता. बदलत बदलत तो अत्यंत प्रतिकारात्मक स्वरूपात राजकीय जत्रांच्या धुमशानीत होऊ लागलेल्या नरहत्येपर्यंत येऊन पोहोचला होता."[५]

वरील विवेचन देशीवादाची गरज समाजाला नव्याने असल्याचे लेखक प्रतिपादन करतो. 'सर्व प्रश्न अनिवार्य' या रमेश इंगळे उत्रादकरांच्या कादंबरीचा विषय शैक्षणिक पर्यावरण व त्याची होणारी घसरण हा असला तरी तिच्या निमित्ताने आपल्या व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात सरसकट फोफावत चाललेल्या अपप्रवृत्तीचे अस्वस्थ करणारे वास्तव रेखाटताना लेखकाने समकालीन जीवनातील मूल्यऱ्हासाचे, नैतिक अध:पतनाचे भेदक दर्शन घडविले, तर 'रिबोट' या कादंबरीतून जी. के. ऐनापुरे यांनी जागतिकीकरणाच्या या काळात गिरणधंद्याला ओहोटी लागल्याने त्याचा परिणाम फक्त सांस्कृतिक देवाणीघेवाणीइतकाच मर्यादित नसून माणसाचं माणूसपण संपुष्टात आणण्याच्या स्तरापर्यंत पसरला आहे. मुंबईतून हद्दपार झालेला माणूस आज खेड्यात विखुरला. एकूणच ओढवलेल्या परिस्थितीतील भयावहता बघून त्याला शेवटच्या घटका मोजण्याचे वेध लागले याचे अत्यंत विदारक चित्रण लेखकाने केले आहे.

रवींद्र शोभणे यांच्या 'पांढर' या कादंबरीचे केंद्र दुष्काळ आहे. सधन असलेले गावखेडं एकविसाव्या शतकात निर्धन होऊन शेवटचा श्वास घेत असल्याचे चित्रण यातून आलेले आहे. " हिरवे हिरवे गार गालीचे हरित तृणाच्या मखमालीचे' किंवा 'चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे' यातील गाव कधीच नाहीसं झालं हे केवळ स्वप्नरंजन वाटतं आता आणि अलीकडे पुन्हा गावाला चिकटलेली नवी समस्या म्हणजे लोडशेंडिंग. दिवसभर वीज नसते. रात्री येणाऱ्या वीजेवर काय शेतीची कामं होतील आणि आता तर तळातून विहीरच कोरडी झाली मग वीज असली काय नसली काय."[६]

पाणी टंचाईने व नव्या आर्थिक धोरणाने गावं नष्ट होत असल्याची खंत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या प्रश्नांच्या मुळापर्यंत जाऊन लेखकाने वेध घेतला. श्याम मनोहर यांनी 'कळ' मधून सर्जनशीलता हरवलेल्याचा शोध घेण्याचा, इतिहास गमावलेल्या ऱ्हासप्राप्त समाजात ज्ञान, राजकारण, अध्यात्म, स्त्रीपुरूष संबंध आणि साहित्य या सर्वच व्यवस्थांची आणि त्यासंदर्भातील मूल्यभानाची काय अवस्था होते याचे भेदक आकलन 'कळ'मध्ये जागोजागी दिसून येते, तर त्यांच्या 'खूप लोक आहेत' या कादंबरीतील प्रत्येक व्यक्तिरेखा धर्माविषयी, अध्यात्माविषयी एक वेगळी दृष्टी व्यक्त करतो. जीवनावर परिणाम करणाऱ्या या घटकांचा कोणताही गंभीर विचार समाजात केला जात नाही हे वास्तव या कादंबरीत प्रभावीपणे मांडले गेले आहे. तर 'एनकाऊंटर' या एकनाथ साळवे यांच्या कादंबरीचे निराळेपण नजरेत भरते. नक्षलवादी चळवळींच्या संदर्भात प्रस्थापित राजकीय व्यवस्थेचे हिंसक रूप या कादंबरीत दाखवून दिले जाते. आपल्या नाकर्तेपणामुळेच नक्षलवादाच्या उदयाला कारणीभूत ठरलेली प्रस्तापित राजकीय व्यवस्था व कायदा आणि सुव्यवस्थेच्या नावाखाली निरपराध आदिवासींवर जुलूम करते. नक्षलवादाचा सूड गोरगरीब आदिवासीवर उगवला जातो. परिणामी नक्षलवादाचा मार्ग उचित दिसत नाही, परंतु लोकशाही मार्गानेही प्रश्न सुअत नाहीत अशा विचित्र कोंडीत नवशिक्षित आदिवासी तरूण सापडला आहे याचे वास्तव रेखाटन लेखकाने केले आहे. तसेच जागतिकीकरणाच्या या गतिमान युगात अशोक पवार यांच्या 'पडझड'मधून वडार जमातीची भटकंती, बिगारीचं काम, एका गावावरून दुसऱ्या गावी उदरनिर्वाहाकरिता मुक्काम हलविणे, भीक मागून पोट भरणे

इत्यादी भटक्या समाजाच्या जगण्याची पडझड विदारकपणे यामधून येते. अस्सल देशीपणाचा तोल सांभाळत भटक्या विमुक्तांच्या बोलीभाषेसहित स्वत:चे गाव व नाव नसलेली ही जमात अत्यंत बिभत्स जीवन जगते याचे उत्तर स्वतंत्र भारतातील लोकशाही देईल काय? हा लेखकाचा प्रश्न आहे. एकूणच नव्वदोत्तरी मराठी कादंबरीचे देशीवादाच्या पार्श्वभूमीवर विवेचन केल्यास उत्तम साहित्य हे कुठल्याही भूमिकेतून पाहिले किंवा तपासले तरी ते उत्तमच ठरते किंवा कोणत्याही नवीन भूमिकेत ते अधिकच तावून सुलाखून निघते असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**

१. अक्षरगाथा, डॉ. मा. मा. जाधव, त्रैमासिक, १० जुलै २०११, पृष्ठ क्र. ३८
२. देशीवाद, अशोक बाबर, साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद, २००५, पृष्ठ क्र. १८
३. नामुष्कीचे स्वगत, रंगनाथ पठारे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, १९९९, पृष्ठ क्र. १८
४. तत्रैव, पृष्ठ क्र. ८४
५. चाळेगत, प्रवीण दशरथ बांदेकर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००९, पृष्ठ क्र. २०४
६. पांढर, रवींद्र शोभणे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई,२००९, पृष्ठ क्र. ७८